# दादाभाई नवरोजी यांच्या आर्थिक सिद्धांताचे वर्तमान संदर्भातील अवलोकन

**प्रा. डॉ. दिलीप तुकाराम कदम**

*इतिहास विभागप्रमुख*

*कै.न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय,*

*मारवड, ता.अमळनेर जि.जळगाव*

***प्रस्तावना -***

*आधुनिक भारतीय इतिहासात भारताचे ईस्ट इंडिया कंपनीने मोठे दुष्कर असे शोषण करून या देशाला कफल्लक केले आहे, याचे शोषण यापूर्वी या इतिहासात मोहम्मद घोरी आणि मोहम्मद गजनी यांनी जी पूर्व मध्यकाळाच्या प्रारंभीच केले तेवढे लूट ही कंपनी सत्ता प्रतिवर्षी भारतातून राज्यकारभार, प्रशासन, पगार, लष्कर आदिच्या नावे करत आहे. या दादाभाई नवरोजीच्या प्रखर अशा विचारातून त्यांनी जो आर्थिक निस्सा:रणाचा सिद्धांत मांडून तत्कालीन परिवेशात आर्थिक राष्ट्रवादाची ओजस्वी अशी प्रेरणा केली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या याच आर्थिक शोषणाच्या सिद्धांताची वर्तमान संदर्भातील परिप्रेक्षात मांडणी केली जाणार आहे.*

**दादाभाई नवरोजी (1825-1917) -**

प्रस्तुत अशा आधुनिक भारताच्या इतिहासात दादाभाई नवरोजी यांना पितामह (ग्रँडफादर) म्हणून ओळखले जाते. नवरोजी हे गुजराती अर्थात मुंबईचे (तत्कालीन मुंबई हा गुजरातचा भाग होता) असून उच्चशिक्षित यशस्वी उद्योजक आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते इंग्लंडच्या संसदेचे खासदार पद मिळवणारे एकमात्र असे भारतीय होते या स्वातंत्र्य चळवळीच्या अनुषंगाने यांचे दोन प्रकारचे अपूर्व योगदान आहे. त्यापैकी एक म्हणजे अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून तिच्यात नवसुशिक्षितांचा सहभाग घडवून आणणे. मवाळवाद्यांची सैद्धांतिक मांडणी करणे. यासाठी अत्यंत संमत अशा पद्धतीने ब्रिटिश सत्तेशी लढा उभारला हे कार्य आणि दुसरे कार्य म्हणजे त्यांनी मांडलेला आर्थिक शोषणाच्या प्रखर असा सिद्धांत होय.

दादाभाई नवरोजी यांचे लेखन -

दादाभाईनी ब्रिटिश सत्तेचे प्रकार असे विश्लेषण केले आहे त्यात त्यांनी सातत्याने आर्थिक विश्लेषण केले आहे यात त्यांचे सर्वात नावाजलेले पुस्तक म्हणजे poverty in India (1876), The European and Asiatic Races (1866), Poverty and Unbritish Rule in India (1901), यामध्ये हे Unbritish Rule in India यांची एकूण ब्रिटिश साम्राज्यवादाच्या संदर्भात फार प्रभावी अशी मांडणी केली आहे.

**आर्थिक विसरण्याचा सिद्धांत-(Economic Drain Theory) –**

दादाभाईनी आर्थिक निस्स:रणाच्या सिद्धांताची मांडणी आपल्या Unbritish Rule in India या ओजस्वी ग्रंथात केली आहे. यामध्ये त्यांनी सिद्धांत, गृहीतके आणि याचा उपसंहार म्हणून साम्राज्यवादाची प्रखर अशी समीक्षा केली आहे यात त्यांनी आपला सिद्धांत प्रतिपादन केला आहे.

भारताच्या इतिहासात प्राचीन मध्ययुगीन काळापासून हा देश ही परकीय सत्तेची वासाहतच राहिला आहे यात मध्ययुगाच्या प्रारंभाला मोहम्मद गजनी आणि मोहम्मद घोरी यांनी जे खूप संहारक अशी अनुक्रमे बारा आणि चौदा आक्रमणे केली, या प्रत्येक वेळी त्यांनी प्रचंड आर्थिक लूट देशातून केली परंतु या आधुनिक काळात ईस्ट इंडिया कंपनीने या दोन्ही लुटी पेक्षाही मोठी रक्कम प्रतिवर्षी व्यापारवाद, प्रशासन, लष्कर आदींच्या नावे करत आहेत आणि अव्याहत लूट करत आहेत. अशाप्रकारे प्रखर मांडणी केली आहे.

**सिद्धांताचे गृहितके -**

दादाभाईनी या सिद्धांताचे गृहीतक पुढील प्रकारे मांडले आहे.

- ब्रिटीशांची भारतात साम्राज्यवादी अशी सत्ता आहे. ब्रिटिशांची भारतीय बाजारपेठ ही दुहेरी स्वरूपाची

कच्च्या आणि पक्क्या अशी दोन्ही मालाची मक्तेदारीपूर्ण आहे.

- ब्रिटिशांच्या प्रशासनावर प्रचंड अवाढव्य असा खर्च आहे.
- या सरकारने प्रचंड कराचे ओझे दिले आहे.
- भारतीय पारंपरिक देशी उद्योगधंदे, लघुउद्योग, हस्तोद्योग आदि यांनी बुडवले, नामशेष केले.
- या दोन्ही उद्योगावर सरकारने प्रचंड प्रशासकीय दबाव दिला आहे.
- इंग्रजांचा शिक्षणावर अत्यल्प असा खर्च आहे.
- ब्रिटिश साम्राज्यवाद ही विखारी यंत्रणा आहे.

दादाभाईंनी आपल्या या सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी प्रामुख्याने कंपनीचा 1851 ते 1870 या वीस वर्षाचा काळ घेतला आहे या विस वर्षाच्या सांख्यिकीय माहिती आधारे त्यांनी मांडणी केली आहे.

**आर्थिक शोषणाचे कारणे -**

दादाभाईंनी या आर्थिक शासनाचे कारणे पुढील प्रमाणे मांडली आहेत.

- इंग्रजांच्या प्रशासनाच्या प्रचंड अशा यंत्रणेवर पगाराचा अवाढव्य असा बोजा होता या पगाराशिवाय त्यांच्या अधिकारीवर्गाचा बिनपगारी असा खर्च आणि उपहाराचीही त्यांनीच पद्धत पाडलेली होती. या शोषणाचे प्रमुख हे कारण होते.
- कंपनी सरकारने एकानंतर एक ज्या जमीन महसूल पद्धती लागू केल्या होत्या यामध्ये कायमधारा, रयतवारी आणि महालवारी यांनी प्रचंड आर्थिक शोषण झाले.
- इंग्रजांची प्रचंड लष्करी यंत्रणा उभी केली होती यावर त्यांच्या पगार शस्त्रास्त्रे आदींवर प्रचंड मोठ्या प्रमाणावर खर्चासाठी शोषण केले जात होते.

**सिद्धांताचे ऐतिहासिक कोट -**

दादाभाईंनी आपल्या या सिद्धांताच्या प्रभावी अशा स्पष्टीकरण हा दाखल भारतीय इतिहासाचा पुढील प्रमाणे धांडोळा घेतला आहे.

"जो दुष्ट प्रहारचा या शतकाच्या प्रारंभी दरसाल 30 लक्ष पौंड होता तो आज दरसाल तीन कोटी पौंड झाला आहे. महंमद गझनीने 18 स्वाऱ्या करून अठरा वेळा हिंदुस्तान लुटला असे हा भारताचा इतिहास सांगतो. त्याने या सर्व स्वाऱ्यात लुटून नेलेली एकूण संपत्ती ही तुम्ही एका वर्षात लुटून नेता, इतकी होऊ शकत नाही, शिवाय त्याने जी हिंदुस्थानला जखम केली ती निदान अठराव्या घावानंतर तरी बंद झाली. पण तुम्ही जो घाव घातला व त्यामुळे जो रक्तपात होत आहे, त्यांला अंतच नाही. ज्याप्रमाणे ऋतू परंपरा नियमितप्रमाणे चालूच असते त्याचप्रमाणे आम्ही जगलो किंवा मेलो तरी आम्ही निपजलेल्या धनापैकी तीन कोटी पौंडचे धन दरसाल देशातून बाहेर जातच आहे."

या प्रकारे दादाभाईंनी अत्यंत परिणामकारक अशी मांडणी केली आहे. याबाबत आचार्य जावडेकर यांनी आपल्या आधुनिक भारत या ओजस्वी ग्रंथात मांडणी केली असून त्यांनी त्यांची तुलना कार्ल मार्क्सशी केली आहे आणि ही मांडणी अशी केली की, मुळात मार्क्सचा जन्म हा भांडवलदारी अशा राष्ट्रात झाला होता त्यामुळे त्याने वर्ग आणि यातून होणारे शोषण याचा शास्त्रीय अभ्यास केला. परंतु दादाभाई यांचा जन्म हा साम्राज्यशाहीतील पारतंत्र अशा राष्ट्रात झाला होता त्यामुळे त्यांनी यापुढे जाऊन एका राष्ट्राचे शोषण दुसरे राष्ट्र कसे करते याचे शास्त्रीय संशोधन सुरू केले त्यामुळे मार्क्स हा यावर समाजवाद हा पर्याय सांगून थांबला आणि दादाभाईंनी मात्र या शोषणाला तो पाहण्यास स्वराज्य हा मुलगामी उपाय दिला. त्यामुळे या मांडणीत त्यांचे योगदान अभूतपूर्व आणि मौलिक असे आहे.

**सिद्धांताचे भाषिक वैशिष्ट्ये -**

दादाभाईंनी या सिद्धांताची अत्यंत ओजस्वी अशी कालक्रम आणि सांख्यिकीय आधारे मांडणी केली आहे. या मांडणीत त्यांच्या भाषेचा विचार केला. यांनी खूप उपहासात्मक किंवा प्रतिकात्मक अशा शब्दाचा वापर केला आहे. यांनी त्यांच्या सर्वाचं प्रशासनिक खर्च, पगार, लष्कर, शस्त्रे आणि महसुली आदींच्या खर्चास त्यांनी आर्थिक लूट असा सर्रास शब्दप्रयोग केला आणि यासच त्यांनी पुढे रक्त शोषणाचीही उपमा दिली आहे.

**सिद्धांतावर टीका -**

दादाभाईंनी जरीवर मांडणी केल्याप्रमाणे यशस्वीपणे या सिद्धांताची ऐतिहासिक दाखले देऊन जरी मांडणी केली असली तरी या सिद्धांतावर तत्कालीन परिपेक्षात मोठी टीका पुढील प्रमाणे करण्यात आली.

- ब्रिटिश सरकारने त्याच्या प्रशासन यंत्रणेने भारतामध्ये शांतता आणि सुव्यवस्था निर्माण केली आहे करत आहे त्यामुळे त्यांच्या यंत्रणा पगार आदींवर होणारा खर्च हा आर्थिक लूट कशी होऊ शकेल.
- सर्व प्रकारच्या सुव्यवस्थेच्या खर्चाना ही लूट संबोधणे योग्य नाही.
- दादाभाईंनी शोषणाचा (द्रव्य आणि रक्त) यांना चक्र असे म्हटले आहे, अर्थात येथील कच्च्या मालाचे ही मुजोरगिरीने शोषण केले जाते आणि ते पक्के करून त्यांचीच मक्तेदारीची बाजारपेठ यास त्यांनी शोषण चक्र असे संबोधले आहे. तेही या टीकाकारांना मान्य नाही. याबाबतीत त्यांच्या देशातील प्रगतीशील औद्योगिक क्रांती त्याचा भांडवलशाही वाद हा बुडाला आहे. त्यामुळे एकीकडे निश्चितपणे भारतीयांचा पूर्वीपेक्षा जीवनस्तर वाढला आहे यामुळे त्यामुळे यास पूर्णतः शोषण म्हणता येईल का? या सिद्धांतावर जरी याप्रकारची टीका केली जात असली तरी ही पूर्णतः एकांगी कशी वाटते.

**आर्थिक राष्ट्रवादाचे प्रमेय -**

दादाभाईंनी आपला आर्थिक विसरण्याचा सिद्धांत मांडला आणि या सिद्धांतात त्यांनी या भारतीय लुटीचे ब्रिटिश साम्राज्यवादी सर्वच पदर उलगडून दाखवले आहेत ज्यांनी या शोषणाची मांडणी करताना मूलतः भारतीयांची एवढी प्रचंड लूट करू शकेल याची पार्श्वभूमी ही भारतीयांच्या या सत्तेत तील पारतंत्र्य आहे अशी मांडणी केली आहे त्यामुळे ही आर्थिक कळस होय आपल्या या पारतंत्र्याची आणि शोषण मान्यतेची कळ होय असा विचार प्रस्तुत केला आणि यातूनच प्रखर असा आर्थिक राष्ट्रवादाच्या विचारांची पायाभरणी झाली या इतिहासात ही फार ऐतिहासिक विडंबनाचा आहे की त्यांनी या देशाकडे आपल्या व्यापारी आर्थिक मनसुबे यातूनच येथील सत्ता हस्तगत केली होती आणि या टप्प्यावर याच मुद्द्याच्याआधारे दादाभाईंनी राष्ट्रवादाचे प्रखर पायाभरणी केली. त्यांनी या सर्व मांडणीतून स्वराज्य हाच उपसंहार मांडला आहे. आर्थिक शोषणातून उद्योगधंदे बुडाले स्थिती लयाला गेली, अवनती झाली आणि आर्थिक मागासलेपणावर त्यांनी प्रखर राष्ट्रीय जनजागृतीची जाणीव करून दिली आणि याचा एकच मंत्र स्वराज्य असा विचार या अंती प्रतिपादन केला.

याप्रकारे दादाभाई नवरोजी यांनी वासाहतिक भारताची आणि पर्यायाने साम्राज्यवादाची प्रकर समीक्षा केली होती या काळात युरोपातही मार्क्स यांनी या साम्राज्यवादाची प्रकरण अशी समीक्षा केली होती परंतु दादाभाईंनी या प्रकारची वास्तवाची मांडणी केली होती. आज घडीला या दादाभाईंच्या व सिद्धांत सुमारे सव्वाशे वर्ष होत आले आहेत त्यांनी या सिद्धांताची मांडणी 1901 मध्ये केली होती. तरीही आजही या सिद्धांताची वर्तमानपत्रापेक्षा वास्तवाशी प्रसंगोचितता आहे. त्यामुळे याची पुढे मांडणी केली जाणार आहे.

**सद्यस्थितीला आर्थिक विपन्नावस्थेतचा भारत -**

भारताच्या स्वातंत्र्याचा यावर्षी आपण पंचाहत्तरी अर्थात अमृत महोत्सव साजरा करीत आहे. इथपर्यंतच्या सर्वच राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक प्रवास खूपच चढ-उताराचा आहे. यामध्ये लोकशाहीची कशी क्रमबद्ध गती आणि प्रगती होत गेली यात पंडित नेहरूंचे योगदान अपूर्व आहे. परंतु आजच्या प्रस्तुत मोदी सरकारमध्ये देश प्रचंड मोठ्या आर्थिक विषन्नावस्थेतून जात आहे याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी खूपच चिंताजनक अशी स्थिती प्रकट केली आहे. आज विकासदर कदापिही 6%च्या वर जाऊ शकत नाही सर्वच बँकांचा विचार केला तर यांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात कर्ज व्यापार-उदीम आणि आपल्या कार्पोरेट मित्रांना बेछूट अशी कर्जे दिली आहेत आणि या कर्जाची थकीत या बँका कधीही पाहिजे तसा पाठपुरावा करताना दिसत नाही. भारतातील आर्थिक चित्रही खूप अजब आहे या देशात शेतकऱ्यांनी ज्या हजारांच्या प्रमाणात कर्ज घेतले त्यांच्या आत्महत्येचे आणि त्यांच्या व्यक्तिगत जीवनाची अकारण व्यसनाधीनता अशा नावाखाली वर्तमानपत्रामध्ये लोकप्रियता दिली जाते परंतु या बँकांनी जी प्रचंड कर्ज दिले आहेत आणि बुडाली याची साधी बातमी वर्तमानपत्रात दिसत नाही.

निश्चितपणाने सद्यस्थितीला आपण स्वतंत्र भारतात आणि जगातील लोकशाही असली तरीही निश्चिती करण्याचा निर्णय विविध सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रे ही त्यांनी खाजगी कंपन्यांना देऊ केली. यात एलआयसीचे खासगीकरण केलेए अंबानी बंधूंना प्रचंड

मोठ्या प्रमाणात व्यापारी मुभा देण्यात आले, अदानीना कोट्यावधी कर्जाची कर्जमाफी करण्यात आली, यांना सरकारी कर्मचाऱ्यांचे पी एफ, डी.सी.पी.एस. आदिची सुमारे सात हजार कोटी पर्यंत कर्जमाफी, सद्यस्थितीला रेल्वेचे जवळपास खाजगीकरण होत चालले आहे यामुळे या सर्वच बाबींवर खूप कृतिशील असा विचार करण्याची गरज आहे. सर्वच जीवनवश्यक वस्तूंना सरकारने जीएसटीचे धोरण लावणे, प्रसार माध्यमांची या सर्वच बाबतीत कमालीची मुस्कटदाबी केली जाते.

दादाभाई नवरोजी यांनी जी मांडणी केली होती तो काळ पूर्णतः परकीय राजवटीचा असा काळ होता आणि ही राजवट मुळातच देशात व्यापार आणि नफा मिळवण्याच्या हेतूनेच येथे प्रस्तुत झाले होते. यामुळे या प्रकाराच्या लुटीबाबत सर्वच सत्ता ही त्यांच्या हाती होती, परंतु आज घडीला एकीकडे प्रचंड मोठ्या प्रमाणात बहुराष्ट्रीय कंपन्या सरकारचे व्यापाराबाबतचे जीएसटीचे धोरणए कर धोरणातील विसंगती आदी बाबी आणि त्यातही एकीकडे शेतीची अर्थव्यवस्था असूनही शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही त्यामुळे जरी आपण आपल्या स्वतंत्र अशा देशाबद्दल ओतपोतपणे बोलत असू तरी आर्थिक प्रश्न प्रति खूपच उदासीन असा आहे. देश पूर्णत याच दादाभाई नवरोजी यांनी मांडलेल्या लुटीच्याच परिघात आहे. केवळ ती परकीय सत्तेची, तर ही स्वीकृत देशाची व्यवस्था आहे.

**निष्कर्ष -**

- दादाभाई नवरोजी यांनी आर्थिक लुटीचा सिद्धांत खूप यशस्वीपणे प्रतिपादिला आहे.
- दादाभाईंनी वीस वर्षाचा आर्थिक सद्यस्थितीचा असा धांडोळा घेतला आणि या आधारे वास्तव मांडणी केली.
- या सिद्धांतात त्यांनी भारतीय इतिहासाची ही पूर्वपरंपरा प्रभावीपणे विशद केली होती.
- आर्थिक शोषणाला त्यांनी रक्त शोषणाची उपमा दिली.
- आज घडीला भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे परंतु आर्थिकबाब प्रश्नांकित आहे.
- सरकारची आर्थिक धोरणे यामुळे देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी होत आहे.
- खाजगीकरणाचे धोरण हे खूप धोकादायक ठरत आहे. यामुळे देशात गंभीर रोजगाराची समस्या उभी होतात.
- उद्योजकांना कर्जमाफी खूप मोठी दिली जात आहे. ते ही सरकारचा जवळच्या अशा उद्योजक मित्राबाबत असे धोरण आहे.
- सरकारची शेतकऱ्यांसाठी उदासीन धोरण आहे.
- रोजगार, विकासदर, मानवी विकास निर्देशांकाबाबत खूप उदासीन असे धोरण आहेत.
- देशाची लुट तितकी बहुराष्ट्रीय कंपन्या अव्ह्यातपणे करत आहेत, तितक्याच प्रखरपणे देशातील मुठभर उद्योजक जे की सरकारचे मित्र आहेत त्यांना हव्या त्या धोरणाची मुभा केवळ सरकार देतोच असे नाही तर ते उद्योजक हे सरकार आणि त्यांचे आर्थिक धोरणे चालवत आहेत. हे फार घातकी अर्थाचे आहे
- दादाभाईंनी आर्थिक लूट आणि आजचे आर्थिक प्रश्न यात जरी सैद्धांतिक खूप फरक असला तरीही देशाची स्थिती समसमान आहे यात देशात कायम पर्याय राहिला आहे.

**संदर्भ -**


- जावडेकर श. द., 2000 - आधुनिक भारत कॉन्टिनेन्टल प्रकाशन
- सरकार सुमित, 2018 - आधुनिक भारत मॅकमिलन प्रकाशन
- चंद्रा बिपिन, 2020 - इंडिया स्ट्रगल फॉर इंडिपेंडेंस
- कदम दिलीप. आधुनिक भारत अथर्व प्रकाशन
- चौधरी के. क. 2008 - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहासए म.सां.सं.मंडळ, मुंबई
- मुखर्जी सद्रांसु, 2020 - इंडिया ग्रिट स्पीच
- शुक्ल आर. एच. आधुनिक भारत, दिल्ली विश्वविद्यालय
- www.googlenauroji.com
- दैनिक लोकसत्ता, दैनिक लोक.